पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ७४० दिनांक - १०/१०/२०२३**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

## घरफोडीच्या गुन्हयामध्ये मागील दोन वर्षापासुन फरार असलेल्या आरोपीस केले जेरबंद

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील पाहीजे आरोपीतांची संख्या वाढल्यामुळे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विनायक गायकवाड यांनी तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे रेकॉर्डवरील पाहीजे आरोपीतांचा शोध घेणेबाबत योग्य त्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे रेकॉर्ड वरील पाहीजे आरोपीतांचा शोध घेत असताना भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ४०३/२०२१, भादंवि कलम ४५४,४५७,३८० या गंभीर घरफोडीच्या गुन्हयामध्ये मागील दोन वर्षापासुन फरार असलेला आरोपी **सोहेल कादर शेख,वय २३ वर्षे,रा.शिवतेजनगर गल्ली नं.४,अप्पर बिबवेवाडी,पुणे पुर्वी रा. शिवतेज नगर गल्ली नं.४,अप्पर बिबवेवाडी,पुणे** हा लेकटाऊन येथे आला असल्याची बातमी पोलीस अंमलदार मितेश चोरमोले, अभिनय चौधरी यांना मिळाली. लागलीच तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी लेकटाऊन येथे जावुन आरोपी सोहेल कादर शेख याचा शोध घेतला असता तो मिळुन आल्याने त्याचेकडे दाखल गुन्हयाचा तपास करता त्याने गुन्हयाची कबुली दिल्याने त्यास नमुद गुन्हयामध्ये अटक केली आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-०२,पुणे,श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग, पुणे,श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विनायक गायकवाड, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.विजय पुराणिक, श्री.गिरीश दिघावकर, सहा. पोलीस निरीक्षक,अमोल रसाळ, पोलीस उप-निरीक्षक,धिरज गुप्ता, गौरव देव, पोलीस अंमलदार,मितेश चोरमोले, अभिनय चौधरी, अवधुत जमदाडे, आशिष गायकवाड, सचिन सरपाले, शैलेश साठे, चेतन गोरे, महेश बारावकर,निलेश ढमढेरे,मंगेश पवार,हर्षल शिंदे,अभिजीत जाधव, निलेश खैरमोडे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, राहुल तांबे, विक्रम सावंत, यांच्या पथकाने केली आहे.